International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 November – December 2023

# दिवाळीनिमित्त मुख्यमंत्र्यांची भेट आनंदाचा शिधा एक अभ्यास – विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा

**प्रा. डॉ. डी. डी. भोसले[1] व आकांक्षा दीपक भोरे[2]**

*[1]मार्गदर्शक, सहा.प्रा., अर्थशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र, यशवंत महाविद्यालय, नांदेड.*

*[2]संशोधक विद्यार्थिनी, यशवंत महाविद्यालय, नांदेड.*

*Corresponding Author - आकांक्षा दीपक भोरे*

**DOI - 10.5281/zenodo.10642681**

**प्रस्तावना (Introduction):**

*Being unwanted, unloved, uncared for, forgotten by everybody, I think that is a much greater hunger, a much greater Poverty than person who has nothing to eat. - Mother Teresa*

जेफ ब्रिज यांच्या मते, १९९०-९१ या वर्षाच्या आकडेवारीनुसार अमेरिकेतील ३५ दशलक्ष लोक उपाशी पोटी झोपतात तर भारतात २२४ दशलक्ष लोक उपाशीपोटी झोपतात. ९०च्या दशकातील परिस्थितीमुळे तत्कालीन सार्वजनिक वितरण प्रणालीत आवश्यक बदल करणे जरुरी झाले. त्यामुळे लक्षित सार्वजनिक वितरण प्रणाली अवलंबित करण्यात आली. यांतर्गत अत्यंत दुर्लक्षित गरीब जनतेकडे लक्ष केंद्रित करण्यात आले. ज्यामुळे सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत कार्यक्षेत्राचा विस्तार झाला. तत्कालीन गरजेनुसार वेळोवेळी सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये विविध योजनांचा समावेश करण्यात आला आहे. यातील एक नवीन क्रांतिकारक योजना म्हणजे आनंदाचा शिधा योजना होय. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवाळीनिमित्त सामान्य जनतेला भेट म्हणून ही योजना सर्वप्रथम सुरू केली.

**इतिहास (History):**

महाराष्ट्र राज्यात ४ ऑक्टोंबर २०२२ रोजी मंत्रिमंडळाची बैठक झाली. या अंतर्गत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र राज्यातील शिधापत्रिकाधारकांना दिवाळी सणानिमित्त आनंदाचा शिदा देण्याचा निर्णय घेतला. आनंदाचा शिधा या संचामध्ये प्रत्येक शिधापत्रिकाधारकांना प्रति एक किलो रवा, चणाडाळ, साखर व एक लिटर पामतेल, शंभर रुपयात देण्याचे निश्चित करण्यात आले. राज्यातील १ कोटी ७० लाख कुटुंबांना म्हणजेच ७ कोटी लोकांना याचा प्रत्यक्ष फायदा होणार आहे. या योजनेचा लाभ अंत्योदय अन्न योजना लाभार्थी, प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थी तसेच

अमरावती, वर्धा, संभाजीनगर, नागपूर अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारकांना देखील मिळणार आहे. २७९ रुपये दरानुसार प्रति संच खरेदी करण्यात आली असून, ४५५ कोटी ९४ लाख आणि इतर खर्च १७ कोटी ६४ लाख असा एकूण खर्च ४७३ कोटी ५८ लाख खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. योजनेच्या अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार टाळण्यासाठी इपोसद्वारे शिधा दिला गेला तसेच जेथे ईपॉसची व्यवस्था नाही. तेथे ऑफलाइन पद्धतीने आनंदाचा शिधा देण्यात आला. नांदेड जिल्ह्यातही या योजनेसाठी अनुदान देण्यात आले. अंत्योदय अन्न योजना लाभार्थी ८७८७७, प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थी ४२८५० तर एपीएल किसान ९०३७५ लाभधारकांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला.

**कार्यप्रणाली (Procedure):**

महाराष्ट्र राज्य सरकार द्वारे सिदाजींना पॅकेते तयार करून जिल्हा गोदापत पर्यंत पाठविले जातात तर जिल्हा गोदामाद्वारे ही पॅकेट त्या जिल्ह्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानात पर्यंत पोहोचवली जातात. स्वस्त धान्य दुकानदार दुकानातील सर्व लाभार्थ्यांना शिधापत्रिके आधारे शिधाजिंनास उपलब्ध करून देतात. ज्या लाभार्थ्यांना शिधा पाकिटे सुपूर्द केली आहेत. त्यांची नोंद दुकानदार इ- पॉस मशीनद्वारे ठेवीत असतो.

**संशोधनाची उद्दिष्टे (Research Objective):**

१) वर्ष २०२१-२२मध्ये नांदेड जिल्ह्यात आनंदाचा शिदाब वाटप अंतर्गत लाभार्थ्यांद्वारे करण्यात आलेली शिधाजिंनासची मागणी आणि वितरण प्रणालीद्वारे करण्यात आलेला शिधाजिंनासचा पुरवठा यांचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहितके (Research Hypothesis):**

१) वर्ष २०२१-२२ मध्ये नांदेड जिल्ह्यात आनंदाचा शिदाब वाटप अंतर्गत लाभार्थ्यांद्वारे करण्यात आलेली शिधाजिंनासची मागणी आणि वितरण प्रणालीद्वारे करण्यात आलेला शिधाजींनासचा पुरवठा यांच्यात समतोल आहे.

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने तथ्य संकलनासाठी द्वितीय आधारसामग्रीचा आधार घेतला आहे. अंतर्गत विविध सरकारी अहवाल यांचा वापर करण्यात आला आहे तसेच आनंदाच्या शिधा ही योजना वर्ष २०२२ मध्ये सुरू करण्यात आली. त्यामुळे अध्ययन कालावधी हा केवळ वर्ष २०२१-२०२२ इतका निश्चित करण्यात आला आहे तसेच अध्ययनासाठी संशोधकाने नांदेड जिल्हा हे

भौगोलिक क्षेत्र निश्चित केले आहे. तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. तथ्यांच्या विश्लेषणाकरिता प्रमाण या सांख्यिकीय तंत्रांचा तसेच तक्ता व आलेख पद्धती यांचा वापर करण्यात आला आहे.

**नांदेड जिल्ह्यातील आनंदाच्या शिधा योजनेचे अध्यायन:**

**अ) तक्त्याद्वरे विश्लेषण -**

**तक्ता क्रमांक १.१**

**नांदेड जिल्हात आनंदाचा शिधा पॅकेटची करण्यात आलेली मागणी आणि पुरवठा वर्ष २०२१-२२**

| अनु. क्र. | तालुका | एकूण मागणी | एकूण पुरवठा | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | ८०७१९ | ८०७१९ | १०० |
| २ | अर्धापुर | १८७९० | १८७९० | १०० |
| ३ | मुदखेड | २१९०५ | २१९०५ | १०० |
| ४ | कंधार | ४३९५३ | ४३९५३ | १०० |
| ५ | लोहा | ५०१८२ | ५०१८२ | १०० |
| ६ | भोकर | २७९६१ | २७९६१ | १०० |
| ७ | उमरी | २०९९० | २०९९० | १०० |
| ८ | देगलूर | ३४८८९ | ३४८८९ | १०० |
| ९ | बिलोली | ३२९०३ | ३२९०३ | १०० |
| १० | नायगाव | ३९३१६ | ३९३१६ | १०० |
| ११ | धर्माबाद | १७५६० | १७५६० | १०० |
| १२ | मुखेड | ५३९६९ | ५३९६९ | १०० |
| १३ | किनवट | ५०२३५ | ५०२३५ | १०० |
| १४ | माहुर | २४६७७ | २४६७७ | १०० |
| १५ | हदगाव | ५३४४५ | ५३४४५ | १०० |
| १६ | हिमायतनगर | २५६८८ | २५६८८ | १०० |
| | **एकूण** | ५९७८१२ | ५९७८१२ | १०० |

**स्त्रोत: जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड.**


तक्ता क्रमांक १.१ चे अध्ययन केले असता असे लक्षात येते की, नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक शिलाजिल्हास बॅगची मागणी ही नांदेड तालुक्यातद्वारे करण्यात आली आहे तर सर्वात कमी मागणी ही धर्माबाद या तालुक्यातद्वारे करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्याची एकत्रित मागणी ही ५.९७.८१२ इतकी आहे. तर संपूर्ण जिल्ह्याला करण्यात आलेला शिधाजीनास बॅगचा पुरवठा हा ५,९७,८१२ इतका आहे. अर्थातच प्रत्येक तालुक्यालाद्वारे करण्यात आलेली मागणी आणि प्रत्येक तालुक्याला वितरण प्रणालीद्वारे करण्यात

आलेला पुरवठा यांचे प्रमाण १००% असल्याचे दिसून येते. नांदेड मागणी एवढाच पुरवठा असल्यामुळे शंभर टक्के ही योजना कार्य सफल झालेली आहे.

**आ) आकृतीद्वारे विश्लेषण –**

**आकृती क्रमांक १.१**

**नांदेड जिल्हात आनंदाचा शिधा पॅकेटची करण्यात आलेली मागणी आणि पुरवठा वर्ष २०२१-२२**




आकृती क्रमांक १.१ चे अध्ययन केले असता आपणास असे लक्षात येते की, नांदेड जिल्ह्यात आनंदाच्या शिधासाठी करण्यात आलेली आनंदाच्या शिध्याची मागणी आणि वितरण प्रणालीद्वारे करण्यात आलेला पुरवठा यांच्यात समतोल आहे. एकूण मागणी दर्शविणारे निळे स्तंभालेख आणि एकूण पुरवठा दर्शवणारी नारंगी स्तंभालेख यांची उंची समसमान आहे. अर्थातच एकूण मागणी आणि एकूण पुरवठा यांचे प्रमाण समान आहे.

**निष्कर्ष (Conclusions):**

१) तक्ता क्रमांक १.१ वरून असे निदर्शनास येते की, नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याला आनंदाचा शिधा हा वाटप करण्यात आला आहे.

२) तक्ता क्रमांक १.१ आणि आकृती क्रमांक १.१ वरून असे निदर्शनास येते की, नांदेड जिल्ह्या अंतर्गत लाभार्थ्यांद्वारे आनंदाच्या शिधा यासाठी करण्यात आलेली मागणी आणि वितरण प्रणालीद्वारे करण्यात आलेला आनंदाचा शिध्याचा पुरवठा यांच्यात समतोल आहे.

३) तक्ता क्रमांक १.१ वरून असे निदर्शनास येते की नांदेड जिल्ह्यात शिद्यासाठी करण्यात आलेली मागणी आणि पुरवठा यांचे प्रमाण समसमान आहे.

**शिफारसी (Recommendations):**

१) आनंदाचा शिधा वाटप करणाऱ्या लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ करण्यात यावी.

२) आनंदाचा शिधा वाटपा अंतर्गत चणाडाळ, पामतेल, रवा, साखर याचबरोबर इतर काही महत्त्वाच्या उपभोग्य वस्तूंचा देखील समावेश करावा.

३) आनंदाच्या शिदाचे वाटप हे निश्चित केलेल्या तारखेपर्यंत करण्यात यावे.

**गोषवरा (Abstract):**

प्रस्तुत संशोधनात संशोधकांनी दिवाळीनिमित्त मुख्यमंत्र्यांद्वारे भेट आनंदाचा शिधा याचे अध्ययन करण्यासाठी नांदेड जिल्ह्याची निवड केली असून, अध्ययन कालावधी हा वर्ष २०२१-२०२२ निश्चित केला आहे. प्रस्तुत संशोधना संशोधकांनी द्वितीयक आधार सामग्रीचा अवलंब केला आहे. द्वितीयक आधार सामग्री मिळवण्यासाठी संशोधकाने जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड याची भेट घेतली. जिल्हा पुरवठा विभागाद्वारे आनंदाचा शिधा या योजनेची संपूर्ण द्वितीयक आधारसामग्री मिळवली. प्रस्तुत संशोधनात काढण्यात आलेले निष्कर्ष हे द्वितीयक आधारसामग्रीवर आधारित असून, हे निष्कर्ष केवळ नांदेड जिल्हा पुरते मर्यादित आहेत.

**संदर्भसूची (References):**

**संदर्भ ग्रंथ (Reference books)**

1. बोधनकर सु. आ., कुलकर्णी मृ. (१९९९). सामाजिक संशोधन पद्धती, *साईनाथ प्रकाशन*, नागपूर.
2. आग्लावे प्र. (२०१०).संशोधन पद्धती व तंत्रे, *श्री साईनाथ प्रकाशन,* नागपूर.
3. मिश्रा जे. पी (२००६).भारतीय अर्थव्यवस्था, *साहित्य भवन प्रकाशन,* दिल्ली.
4. Swaminathan M. (२००३). Weaking welfare, *Manohar publisher and distributor,* Delhi.
5. Majumdar B. (२००७). Political economy and public distribution system in India, *concept publishing,* Delhi.

**सरकारी अहवाल (Government report):**

१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन नांदेड जिल्हा, (विविध अंक), माहिती व प्रसारण मंत्रालय महाराष्ट्र सरकार.

२) जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड.

**संकेत स्थळे (Websites)**

1. https://nfsa.gov.in
2. https://en.m.wikipedia.org
3. https://hood.gov.in
4. https://fao.org
5. https://hadesh.maharashtra.gov.in
6. https://shodhganga.inflibnet.ac.in
7. https://ww.who.int
8. https://dfpd.gov.in